


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे | अंक : ६८४. वा | गुरुवार | दि. १५ फेब्रुवारी २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# महाविकास आघाडीचा लोकसभेसाठी जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरला

## शरद पवार यांची २४ फेब्रुवारीला पुण्यात सभा...

**वृत्तसंस्था/ पुणे**

देशात लोकसभा निवडणुकांना अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. महाराष्ट्रात महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा सरळ सामना होणार आहे. त्यामुळे महायुती आणि महाविकास आघाडीने आता जोरदार तयारीला सुरुवात केली आहे. त्यात आता जागा वाटपामध्ये महाविकास आघाडीने आघाडी घेतल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. महाविकास आघाडीचा जागा वाटपाचा फॉर्मुला जवळपास निश्चित झाल्याची माहिती मिळत आहे. त्याचबरोबर कोणत्या पक्षाला किती जागा मिळणार हे देखील महाविकास आघाडीचे ठरलं आहे. आज पुण्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची एक बैठक पार पडली. या बैठकीमध्ये आगामी लोकसभा निवडणुकी संदर्भात रणनीतीवर चर्चा करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गट महाराष्ट्रातील कोणत्या लोकसभा मतदारसंघावर दावा करू शकतो या संदर्भात आज सविस्तर चर्चा करण्यात आली. यामध्ये साधारणपणे १२ ते १३ जागा शरद पवार गटाला मिळणार असल्याची माहिती मिळाली आहे.विशेषतः पश्चिम महाराष्ट्रामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस हा मजबूत पक्ष मानला जातो. राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर देखील शरद पवार यांनी पश्चिम महाराष्ट्रामध्ये आपली ताकद अबाधित ठेवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट पश्चिम महाराष्ट्रातील बारामती, शिरूर, माढा, सातारा या जागा लढवणार असल्याचं जवळपास आता निश्चित झालं आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नाव आणि चिन्ह अजित पवार गटाला मिळाल्यानंतर शरद पवार गट हा काँग्रेसमध्ये सामील होणार असल्याची चर्चा सकाळपासून



माध्यमांमध्ये सुरू होती.मात्र या चर्चा निरर्थक असल्याचं शरद पवार गटाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. आता शरद पवार हे पक्षाचे नवीन नाव आणि चिन्ह घेऊन महाराष्ट्राच्या राजकारणात इतका जोमाने उतरणार असल्याचे चित्र आहे. आता शरद पवार हे लवकरच महाराष्ट्राचा दौरा करणार असून महायुतीच्या विरोधात जोरदार सभा घेणार आहेत. याचीच सुरुवात पुण्यातून होणार असून येत्या २४ तारखेला शरद पवार पुण्यामध्ये महाविकास आघाडीची जाहीर सभा घेणार आहेत.

# अवैध रेती उत्खनन करणाऱ्या तीन बोटी आणि इतर साहित्य जागेवरच केले नष्ट

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

अवैध रेती उत्खनन थांबविण्यासाठी महसूल विभागाने जोरदार मोहीम हाती घेतली असून उपविभागीय अधिकारी समाधान गायकवाड यांच्या नेतृत्वात धाडसी कारवाई करत रेती उत्खनन करणाऱ्या तीन बोटी फायबर सेक्शन पाईप इंजिन व इतर साहित्य जप्त करून एनडीआरएफ च्या पथकामार्फत जागेवरच नष्ट केल्याने रेती माफियामध्ये दहशत पसरली आहे दरम्यान अवैध रेती उत्खनन व वाहतूक होऊ नये यासाठी महसूल नायब तहसीलदार डॉ आसमा मुजावर आणि त्यांचे पथक अवैध रेती वाहतुकीवर करडी नजर ठेवत असून अवैध रेती वाहतुकीला मोठा चाप बसणार आहे याबाबत माहिती अशी की देउळगावराजा तालुक्यामध्ये अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुक होत असल्याची माहिती मिळताच जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी, समाधान गायकवाड देऊळगावराजा तहसीलदार वैशाली डोंगरजाळ व पथकातील, महसूल नायब तहसीलदार डॉ अस्मा मुजावर आणि मंडळ अधिकारी व तलाठी यांच्यासह मेहुणराजा शिवारामध्ये खडकपूर्णा प्रकल्प क्षेत्रामध्ये दिनांक ०८ ला अवैध रेती उपसा करण्यासाठी वापरण्यात येणारी १ बोट, फायबर, सेक्शन पाईप जोडणी केलेले प्रत्येकी १०० फुट जोडणी केलेले एकुण ०३ नग तसेच, दिनांक ला अवैध रेती उपसा करण्यासाठी वापरण्यात येणारी १ बोट, फायबर, इंजीन, सेक्शन पाईप जोडणी केलेले, आणि दिनांक-१३.०२.२०२४ रोजी अवैध रेती उपसा करण्यासाठी वापरण्यात येणारी १ बोट, फायबर, सेक्शन पाईप जोडणी आदी साहित्य जप्त करून



एनडीआरएफ चे पथक बोलावून त्यांच्यामार्फत सदर अवैध रेती उपसा करणारे बोटीसह इतर साहित्य जागेवरच नष्ट करण्यात आले यापुढेही बोटीच्या सहाय्याने अवैध रेती उत्खननचा प्रयत्न झाल्यास चे पथकाच्या मार्फत कारवाई करण्यात येईल असा इशारा उपविभागीय अधिकारी समाधान गायकवाड यांनी दिला असल्याने रेती माफियामध्ये या कारवाईमुळे चांगली दहशत पसरली आहे

# नवीन संस्था, अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाच्या व्यवसाय प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविण्यासाठी नवीन संस्था आणि अभ्यासक्रम सुरू करण्यासाइी अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. नवीन संस्थांनी मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे व अस्तित्वात असलेल्या संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम किंवा तुकडी सुरु करण्यास मान्यता देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील इच्छुक संस्थांनी आपले विहित नमुन्यातील प्रस्ताव दि. २९ फेब्रुवारी २०२४ पर्यंत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय, गणेशनगर, एचपी गॅस गोडाऊन समोर, बुलडाणा येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत. मंडळाद्वारे मान्यता प्राप्त अभ्यासक्रमांची यादी, सविस्तर अभ्यासक्रम, अभ्यासक्रमांचे वैशिष्ट्य, अभ्यासक्रमांची समकक्षता, संबंधित शासन निर्णय, माहिती पुस्तिका, अर्ज करण्यासाठी गुगल फॉर्म लिंक आदी सर्व माहिती मंडळाच्या msbsvet.edu.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. याबाबत अधिक माहितीसाठी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, बुलडाणा येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, व्ही. बी. बचाटे यांनी केले आहे.

# रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीवर्धन वापरास सूट

जनसंचलन /बुलडाणा



शासनाच्या निर्णयानुसार ध्वनीवर्धन वापरात १५ दिवसांची सूट जाहिर करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी यांना दिलेल्या अधिकारानुसार १२ दिवसांसाठी ध्वनीवर्धन वापरास सूट देण्यात आली आहे. यामुळे सूट असलेल्या दिवशी रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीवर्धन वापरात येणार आहे. ध्वनीवर्धन वापराबाबत श्रोतृगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागा खेरीज इतर ठिकाणी जिल्ह्याच्या निकडीनुसार वर्षामध्ये १५ दिवस निश्चित करुन सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत सूट जाहीर करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत केले आहे. जिल्हाधिकारी यांनी संबंधित ध्वनी प्राधिकरण तथा पोलीस अधिक्षक पोलीस आयुक्त यांच्याशी सल्लामसलत करुन जिल्हयासाठी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीमध्ये १५ दिवस निश्चित करून त्याची आगाऊ यादी तयार करण्याबाबत सूचना आहेत. त्यानुसार जिल्हादंडाधिकारी यांनी ध्वनीपेक्षक व ध्वनीवर्धक यांचा वापर ध्वनीची विहित मर्यादा राखून सकाळी ६ वाजल्यापासून रात्री १२ वाजेपर्यंत १२ दिवस अटी आणि शर्तीच्या अधिन राहून जाहीर करीत आहे. यात शिवजयंती, ईद-ए-मिलाद, डॉ आंबेडकर जयंती, १ मे महाराष्ट्र दिन, गणपती उत्सवातील ४ दिवसात दुसरा दिवस, पाचवा दिवस, गौरी विसर्जन व अनंत चर्तुदशी, नवरात्री उत्सवामधील २ दिवसात अष्टमी व नवमी, दिवाळीतील १ दिवस लक्ष्मीपूजन, ३१ डिसेंबर रोजी एक दिवस असे एकूण १२ दिवस वरीलप्रमाणे १२ दिवस जाहिर करण्यात आले आहे. उर्वरीत ३ दिवस राखीव ठेवण्यात आले असून महत्त्वाचे वेळी व गरज भासल्यास त्या वेळी निश्चित करण्यात येणार आहे, असे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

# अवैध रेती वाहतूक करणाऱ्या वाहनावर स्थानिक गुन्हे शाखा पथकाची धडाकेबाज कारवाई

जनसंचलन/ लोणार

मराठवाड्यातून विदर्भात अवैधरीत्या रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनावर बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धडाकेबाज कारवाई करत रेतीमाफीच्या मुसक्या आवळल्या याबाबत सविस्तर वृत्त असे की मराठवाड्यातून विदर्भात दिवस रात्र अवैधरित्या चोरट्या मार्गाने रेतीची वाहतूक होत असल्याची. गोपनी माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोहे का राजेंद्र अंभोरे पो का अमोल शेजोळ पो का जयंत बोचे यांना मिळाली त्यानुसार सदर पथकाने लोणार मेहेकर रस्त्यावरील श्रद्धा पेट्रोल पंप जवळ दिनांक १२ फेब्रुवारी २०२४ रोजी रात्री नऊ वाजे दरम्यान सापळा रचला व त्यामध्ये मराठवाड्यातून टाकळखोपा तालुका मंठा जिल्हा जालना येथील आरोपी योगेश दत्ता वाघ हा पिवळ्या रंगाचे लेलँड वाहन क्रमांक एम एच २१ बीजी ७७७१ ने अवैध रेती वाहतूक करताना आढळून आला वाहनचालकाकडे रेती बाबत चौकशी केली असता त्याच्याकडे कुठलाही रेतीचा परवाना नव्हता त्यामुळे सदर वाहन लोणार पोलीस स्टेशनला जप्त करत लोणार पोलीस स्टेशनला कलम ३७९ भादवी सह कलम २१ (१)(२) गौण खनिज अधिनियम १९५७ नुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास लोणार पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक निमिष मेहेत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहे का संतोष चव्हाण




पो का अनिल शिंदे गजानन डोईफोडे ज्ञानेश्वर निकस करीत असून स्थानिक गुन्हे शाखेच्या या पथकाने केलेल्या कारवाई.चे सर्व स्तरातून कौतुक होत असून या धडक कारवाईमुळे आयुर्वेद येथे वाहतूक करणाऱ्याचे धाबे दणाणले आहे

# मलकापूर पांग्रा ग्रामपंचायतीचा अनागोंदी कारभार अतिक्रमणाच्या नोंदी घेण्यास भेदभाव

जनसंचलन/ सिंदखेडराजा



सिंदखेड राजा तालुक्यातील मलकापूर पांग्रा येथील ग्रामपंचायतीचा अनागोंदी कारभार सुरू असून गाव नमुना ८ वर अतिक्रमणच्या नोंदी पैसे घेऊन करणे सुरू आहे अनेक पदाधिकाऱ्यांनी आपल्या नावावरची अतिक्रमण दुसऱ्याच्या नावावर केलेले आहे तर ज्यांनी अर्थपूर्ण व्यवहार केला नाही त्यांच्या नोंदी ग्रामपंचायत करत नसल्याचा आरोप करीत या प्रकरणी चौकशी करावी अशी मागणी माजी सरपंच साबेर पठान यांनी केली आहे याबाबत माहिती असे की गावठाण हद्द सोडून गावच्या लगत मोठ्या प्रमाणात लोकांनी अतिक्रमण करून त्यावर बांधकाम करण्यात आले आहे या बांधकामाच्या नोंदी ग्रामपंचायत मध्ये पैसे देऊन करण्यात येत आहेत ग्रामपंचायत च्या पदाधिकाऱ्यांनी स्वतःच्या अतिक्रमांच्या नोंदी दुसऱ्याच्या नावावर केल्या आहे असे असताना मात्र ज्यांनी पैसे दिले नाही त्यांच्या नोंद ग्रामपंचायत करण्यास टाळाटाळ करत आहेत बाहेर गावातील झोटिंगा येथील लोकांनी लाखो रुपये देऊन अतिक्रमण विकत घेऊन त्यावर बांधकाम केले आहे त्याच्या नोंदी घेण्यात आल्या मात्र गावातील नोंदी करण्यास आधी ठराव घ्यावा लागेल त्यानंतर नोंदी करन्यात येतील असे सांगून त्यांना वापस पाठवल्या जात आहे त्यामुळे तात्काळ याकडे लक्ष देऊन या अर्थपूर्ण नोंदीची चौकशी करावी अशी मागणी माजी सरपंच साबेरसेठ पठान यांनी केली आहे

# मलकापुरात दंगल घडविण्याचा उपद्रवखोरांचा प्रयत्न

## पोलिसांनी कारवाई करून हाणून पाडले षडयंत्र, धुमाकूळ घालणाऱ्या उपद्रवखोरांविरुद्ध गुन्हा...

## पत्रकार दीपक इटणारे यांच्यावर हल्ला

जनसंचलन/मलकापूर

शहरातील एका युवकाने सोशल मीडियाच्या इंस्टाग्राम अकाउंट पोस्टवर वादग्रस्त कमेंट केली. या कमेंटने अल्पसंख्यक समाजाच्या भावना दुखावल्याचे कारण पुढे करून या उपद्रवखोरांनी मलकापूर पोस्टे गाठून हजारोंच्या संख्येने दाखल झाले. पोलिसांनी या घटनेचे गांभीर्य लक्षात घेत त्या तरुणांवर गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे. या वेळी उपद्रवखोरांनी शहरात दंगलसदृश्य परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न केला पण पोलिसांनी तो हाणून पाडला आहे.

पोलिस प्रशासनाने योग्य ती कारवाई करून सुद्धा अल्पसंख्यक समाजाच्या उपद्रवखोरांनी पोस्टेच्या आवारात भडकावू नारे देऊन हा जमाव रस्त्याच्या दिशेने जाऊन जातीय दंगल घडवण्याचा प्रयत्न करीत होता. मात्र, पोलिसांच्या समयसूचकतेने मोठा अनर्थ टळला. हा जमाव एवढ्यावरच थांबला नाही तर या संपूर्ण घटनेचे वृत्तांकन करणाऱ्या दैनिक तरूण भारतचे पत्रकार दीपक इटणारे यांच्यावर जमावाने प्राणघातक हल्ला करून त्यांच्या दुचाकीचे सुद्धा नुकसान करण्यात आले आहे. याप्रकरणी दंगल घडवून गावात अशांतता पसरवणारा समाजाच्या अल्पसंख्यक उपद्रवखोर तरुणाविरुद्ध अद्यापही गुन्हा दाखल झाला नसून, याबाबत पोलिस निरीक्षकांशी संपर्क साधला असता त्यांनी गुन्हा नोंद होण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले. गेल्या तीन महिन्यांपासून सोशल मीडियावर जातीवाचक पोस्ट टाकून जातीय दंगली घडवण्याचा प्रयत्न शहरातील काही नागरिक करीत आहेत. मागील दोन महिन्यांमध्ये ही तिसरी घटना आहे. मागील दोन महिन्यांमध्ये अल्पसंख्यक समाजाच्या व्यक्तीने दोन वेळेस हिंदू समाजाच्या भावना दुखावतील अशी पोस्ट सोशल मीडियावर वायरल केली होती. ही बाब हिंदू तरुणांच्या लक्षात येताच त्यांनी पोलिस स्टेशन गाठत ही बाब पोलिसांच्या लक्षात आणून देऊन, पोलिसांनी त्या तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. मात्र, हिंदू तरुणांनी मोजक्याच संख्येत जाऊन गुन्हा नोंदवला. मात्र, या घटनेला काहीच दिवस होऊन जात नाही तर अशीच परत एक घटना १२ फेब्रुवारी सायंकाळच्या



सुमारास उघडकीस आली. हिंदू तरुणाने अल्पसंख्यक समाजाच्या व्यक्तीच्या इंस्टाग्राम पोस्टवर अल्पसंख्यक समाजाच्या भावना दुखातील अशी कमेंट केली. ही बाब त्यांच्या लक्षात येताच त्यांनी हजारोंच्या संख्येने पोस्टे गाठले व त्या तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल केला. मात्र, त्या तरुणावर गुन्हा दाखल करून सुद्धा अल्पसंख्य समाजाच्या हजारो तरुणांनी पोस्टेमध्ये भडकावू नारे दिले. ते एवढ्यावरच न थांबता त्यांनी गावातील चारखांब चौक रोडने रस्ता जाम करून शहरात जातीय दंगली घडवण्याचा प्रयत्न केला. शहरात अशांतता पसरविण्याचा प्रयत्न करणाऱ्या ५० ते ६० अल्पसंख्यक समाजाच्या उपद्रवखोर तरुणांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मात्र या प्रकाराचा मुखिया कोण हे अद्यापही समोर आलेले नाही. या घटनेचा पुढील तपास पोलिस करीत आहेत.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# राजर्षी शाहू मल्टिस्टेटला बँको पुरस्कार...

## दिव दमण येथे दिमाखदार सोहळ्यात संस्थाध्यक्ष मालतीताई शेळके यांनी स्वीकारला पुरस्कार...

जनसंचलन/बुलढाणा

ग्राहकांना सर्वोत्तम बँकींग सेवा प्रदान करणाऱ्या राजर्षी शाहू मल्टिस्टेट को- ऑप. क्रेडिट सोसायटीला सहकार क्षेत्रातील प्रतिष्ठेचा बँको पुरस्कार मिळाला आहे. दिव दमण (गुजरात) येथे १३ फेब्रुवारी रोजी एका दिमाखदार सोहळ्यात संस्थाध्यक्ष मालतीताई शेळके यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सहकारी पतसंस्थांसाठी दिव दमण येथे दोन दिवसीय ॲडव्हानटेज सहकार परिषेदेचे आयोजन करण्यात आले होते. सहकारातील महत्वाच्या विषयांवर चर्चासत्र आणि इतर कार्यक्रम घेण्यात आले. सहकार परिषदेला राज्यातील नामवंत संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. राजर्षी शाहू मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीला सर्वोत्कृष्ट संस्थेचा पुरस्कार मिळाला. ग्राहकांना सर्वोत्तम बँकिंग सेवा देण्यासाठी संस्था कटिबद्ध आहे. त्यादृष्टीने सुरु असलेल्या कार्याची दखल पुरस्काराच्या रूपाने घेण्यात आली. या गोष्टीचे विशेष समाधान आहे. पुरस्कार मिळाल्याने आणखी जबाबदारी वाढली असून नवी ऊर्जा मिळाली आहे. आपल्याकरिता हा अभिमानाचा क्षण असून हा पुरस्कार संस्थेचे ग्राहक, खातेदार, ठेवीदार यांना अर्पण केल्याची प्रतिक्रिया मालतीताई शेळके यांनी व्यक्त केली. यावेळी सरव्यवस्थापक दिलीप चव्हाण, पवन सावळे यांची उपस्थिती होती.




# भ्रष्टाचार निर्मुलन दक्षता समितीकडे तक्रार दाखल करण्याचे आवाहन




जनसंचलन/बुलढाणा

जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन दक्षता समिती सभा आयोजित करण्यात येणार आहे. यात नागरिकांनी तक्रार दाखल करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. शासनाच्या निर्णयानुसार शासकीय कामामध्ये विलंब, गैरव्यवहार व अकार्यक्षमता व इतर कारणाने होणाऱ्या भष्ट्राचाराचे तक्रारीची दखल घेण्याकरीता बुलडाणा जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हास्तरावरील खाते प्रमुख स्तरावरील विभागनिहाय दक्षता समिती गठीत करण्यात आली आहे.नागरिकांनी आपल्या तक्रारी संबंधित विभाग प्रमुख यांच्याकडे सादर करव्यात. सदर तक्रारीबाबत तक्रारकर्त्यांचे समाधान झाले नसल्यास तक्रारीच्या अहवालासह जिल्हास्तरीय दक्षता समितीमध्ये तक्रार दाखल करावी, असे आवाहन मुख्य कार्यकरी अधिकारी विशाल नरवाडे यांनी केले आहे.

# शिवालय बुलढाणा येथे पुलवामा हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना शहर भाजपच्या वतीने श्रद्धांजली




जनसंचलन/बुलडाणा

१४ फेब्रुवारी सन २०१९ रोजी झालेल्या या आतंकी हल्ल्यात ४० जवानांना वीरमरन आले होते. जम्मू-श्रीनगर या राष्ट्रीय महामार्गावर ७८ बसेस मधून एकूण २५०० सीआरपीएफ जवानांचा ताफा हा रस्त्याने चालला असता अचानक झालेल्या आतंकी भ्याड हल्ल्यात आपले भारताचे देशाचे ४० जवान शहीद झाले. या अनुषंगाने आज शहर भाजपाच्या वतीने १४ फेब्रुवारी हा काळा दिवस पाळून या वीरमरण आलेल्या शहीद जवानांना आदरांजली / श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी झालेल्या घटनेबाबत १४ फेब्रुवारी हा काळा दिवस म्हणून बुलढाणा शहराध्यक्ष श्री अनंता शिंदे प्रकाश टाकला या श्रद्धांजलीपर कार्यक्रमात कामगार मोर्चाचे महाराष्ट्र सचिव श्री विश्रामजी पवार, कामगार जिल्हाध्यक्ष श्री दत्ताजी शिंदे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष श्री दत्ताजी पाटील,बुलढाणा शहराध्यक्ष अनंता शिंदे महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष सौ अलकाताई पाठक , जिल्हा सरचिटणीस उषाताई पवार, महिला मोर्चा बुलढाणा शहराध्यक्ष वर्षाताई पाथरकर, योगिता बढे, मीनाताई बिल्लारी, राधाबाई सोनवणे ,अर्चना कानडजे ,कस्तुराबाई चव्हाण, शांताबाई चव्हाण ,उत्तम शेवाळे ,रघुनाथ जाधव, आणि असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते

# वागळेंवरील हल्ल्याचे मोताळ्यात पडसाद..!

जनसंचलन/मोताळा

जेष्ठ पत्रकार निखिल वागळे यांच्यावर पुणे येथे झालेल्या हल्ल्याचा मोताळा प्रेस टाइम्स व फुले शाहू आंबेडकरी विचारधारा जोपासणाऱ्या कार्यकर्त्यांनी मंगळवार (ता.१३) मोताळा येथे निदर्शने करून निषेध नोंदविला. यावेळी तहसीलदारांमार्फत राज्याचे गृहमंत्री यांना निवेदन देण्यात आले आहे. पुणे येथे पुरोगामी संघटनांकडून ९ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या निर्भय बनो सभेला जाताना पत्रकार निखिल वागळे यांच्या गाडीवर काही समाजकंटकांनी हल्ला चढवला.दरम्यान मोताळा प्रेस टाइम्स तसेच फुले,शाहू,आंबेडकरी विचारधारा जोपासणारे विविध राजकीय पक्ष व सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी दंडांवर काळ्या फिती बांधून या हल्ल्याचा निषेध नोंदविला.यावेळी मोताळा बस स्थानक चौकात निदर्शने करण्यात आली.सदर हल्लेखोरांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदनावर मोताळा प्रेस टाइम्सचे अध्यक्ष सँडी मेढे,काँग्रेस नेते गजानन मामलकर,समतेचे निळे वादळ मोताळा तालुकाध्यक्ष अरुणभाऊ डोंगरे,राष्ट्रवादी विधानसभा अध्यक्ष डॉ.शरद काळे,वंचित जिल्हा नेते प्रशांतभाऊ वाघोदे,जगन उमाळे, सुधाकर बोरसे,अनिल खराटे, कैलास खराटे,सादिक शेख,शाहीद कुरेशी,अमर कुळे,वैभव वानखेडे, वसंत जगताप,तुळशीराम नाईक,मिलिंद अहिरे,जितु खराटे,रोशन गायकवाड,अमोल डोंगरे,सतीश नरवाडे,महेंद्र मेढे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.दरम्यान बोराखेडीचे ठाणेदार सारंग नवलकार यांच्या मार्गदर्शनात पीएसआय विजयकुमार घुले,पोहेकाँ नंदकिशोर धांडे,पोकाँ मंगेश पवार व सहकाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



# निश्चय पूर्तीचा महामेरू महानाट्यास उस्फूर्त प्रतिसाद

## खामगाव येथे महासंस्कृती महोत्सव...

जनसंचलन/ खामगाव

खामगाव येथील महासंस्कृती महोत्सवात आज दि. १३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित निश्चय पूर्तीचा महामेरु महानाट्य सादर करण्यात आले. आहे. या महानाट्यास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महानाट्याच्या सुरुवातीला आयोजित कार्यक्रमात महानाट्य आयोजनासंदर्भात माहिती देण्यात आली. यावेळी आमदार ॲड. आकाश फुंडकर, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे, उपविभागीय अधिकारी रामेश्वर पुरी, तहसीलदार अतुल पाटोळे आदी उपस्थित होते. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय व बुलढाणा जिल्हा प्रशासनाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर येथील क्रीडा संकुलात महासंस्कृती महोत्सवास सुरुवात झाली आहे. या महोत्सवास खामगाव येथे चांगला प्रतिसाद मिळाला. या महोत्सवात पारंपरिक कला प्रकारही स्थानिक कलाकारांकडून सुरुवातीला सादर करण्यात आले. या महोत्सवातील महानाट्यास नागरिकांना प्रवेश विनामुल्य आहे.







# खडकपूर्णातील अवैध वाळू उपशावर कारवाई सुरू. एनडीआरएफने उध्वस्त केल्या ६ बोटी सीआरपीएफने पुरवले संरक्षण; अद्यापही शोध मोहीम सुरूच

**जनसंचलन/ चिखली**

खडकपूर्णा जलाशयातील वादग्रस्त ठरलेल्या अवैध वाळू उपसा विरोधात सर्वत्र ओरड होत असताना आणि इसरुळ ग्रामपंचायतचे माजी सरपंच संतोष भुतेकर यांनी आत्मदहनाचा इशारा दिल्यानंतर प्रशासनाला खडबडून जाग आली असून आता खडकपूर्णा जलाशयातील अवैध वाळू उपसा करणाऱ्या बोटींवर धडाकेबाज कारवाई करण्याची मोहीम महसूल विभागाने हाती घेतली आहे. या अंतर्गत दि. १३ व १४ फेब्रुवारी रोजी एन डी आर एफच्या टीमने सीआरपीएफ जवानांच्या संरक्षणात केलेल्या कारवाईमध्ये ६ बोटी उध्वस्त करण्यात आल्या असून आणखी काही बोटी आढळतात का त्याचा शोध घेण्याची मोहीम सुरू आहे. याबाबतची थोडक्यात माहिती अशी की, इसरुळचे सरपंच संतोष भुतेकर यांनी आपण दि. १३ फेब्रुवारी रोजी मंत्रालयात महसूलमंत्र्यांच्या दालनात आत्मदहन करणार असल्याचा इशारा जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य शासनाला दिला होता. या इशाऱ्यानंतर जिल्हा प्रशासन अलर्ट मोडवर आले व सिंदखेड राजा उपविभागीय महसूल अधिकारी यांच्यामार्फत भुतेकर यांना आत्मदहनापासून परावृत्त करण्याचे काम पहिले हाती घेण्यात आले. ११ फेब्रुवारी रोजी भुतेकर हे मुंबईकडे निघाले असताना समृद्धी महामार्गावर त्यांना अंढेरा पोलिसांनी ताब्यात घेतले व सिंदखेड राजाचे उपविभागीय अधिकारी समाधान गायकवाड यांच्यासमोर उपस्थित केले. तेथे झालेल्या चर्चेतून समाधान झाल्यामुळे भुतेकर यांनी आपले आत्मदहन रद्द केले. उपविभागीय अधिकारी गायकवाड यांनी दिलेल्या लेखी आश्वासनानुसार लगेच खडकपूर्णा जलाशयातील अवैध वाळू उपसा करणाऱ्या बोटींची शोध मोहीम एनडीआरएफच्या टीमने हाती घेतली. या टीमला संरक्षण पुरण्यासाठी सीआरपीएफचे जवान देखील तैनात



करण्यात आले. या शोध मोहिमेंतर्गत ६ बोटी आढळून आल्या. ह्या सर्व बोटी जेसीबीच्या सहाय्याने उध्वस्त करण्यात आल्या असून आणखी काही बोटी खडकपूर्णा जलाशयात मिळून येतात काय त्याचा शोध घेणे सुरू आहे. सदर कारवाई धडाकेबाज पद्धतीने सुरू असून त्यामुळे अवैध वाळू माफियांचे मात्र धाबे दणाणले आहे. ही कारवाई अशीच पुढेही कायमस्वरूपी सुरू राहावी आणि खडकपूर्णामधील वाळू तस्करी त्वरित थांबावी अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

# डॉ. होमीभाभा प्रात्यक्षित परिक्षेत सहकर विद्या मंदिरचा चि. शशांक देवकर विदर्भातून सर्वाधिक गुण मिळवित प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण

**जनसंचलन/बुलढाणा**

मुंबई सायन्स टिचर्स असोसिएशन च्या वतीने घेण्यात आलेल्या डॉ. होमीभाभा बालवैज्ञानिक परीक्षेच्या प्रात्यक्षिक परिक्षेत सहकार विद्या मंदिर, बुलडाणा येथील चि. शशांक विलास देवकर यांने घवघवीत यश प्राप्त करीत विदर्भातून प्रथम क्रमांक प्राप्त केला. सदर परीक्षा ही तीन स्तरावर घेण्यात येत असते. यामध्ये प्रथम स्तरावर ८२ गुण घेवून शशांकने विदर्भातून प्रथम क्रमांक प्राप्त केला. तसेच द्वितीय स्तरावरील प्रात्यक्षीक परीक्षेत सुध्दा त्याने ४४.०६ गुण घेवून विदर्भातून प्रथम येण्याचा मान मिळविला. यानंतर त्याची तृतीय स्तरासाठी (मुलाखत) निवड झालेली आहे. चि.शशांकचे अभिनंदन संस्थेच्या अध्यक्षा सौ.कोमल झंवर, प्राचार्य व मुख्याध्यापिका यांनी केले असुन त्याला पुढील




परिक्षेसाठी शुभेच्छा दिल्यात. चि.शशांकनी त्याच्या यशाचे श्रेय संस्थेच्या अध्यक्षा, प्राचार्य, मुख्याध्यापिका व सर्व शिक्षकवृंदाना दिले आहे.

# महासंस्कृती महोत्सवाचे थाटात उद्घाटन
## गायक राहुल सक्सेना यांच्या संगीत रजनी कार्यक्रमाने सुरुवात

**जनसंचलन/बुलढाणा**

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग आणि जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा यांच्या वतीने आयोजित महासंस्कृती महोत्सवाचे आज दि. १२ फेब्रुवारी रोजी थाटात उद्घाटन झाले. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी सुनिल विंचरकर, निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपविभागीय अधिकारी रामेश्वर पुरी, तहसीलदार अतुल पाटोळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अशोक थोरात, मुख्याधिकारी प्रशांत शेळके आदी उपस्थित होते. महासंस्कृती महोत्सवास आज पासून सुरवात झाली आहे. खामगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानावर दोन दिवसीय सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. आज पहिल्या दिवशी दि. १२ फेब्रुवारी रोजी गायक राहुल सक्सेना यांच्या समूहाचा संगीत रजनी कार्यक्रम झाला. गणेश वंदनाने संगीत रजनीची सुरवात करण्यात आली. त्यानंतर राहुल सक्सेना यांनी विविध गीते सादर केली. शामल देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. महासंस्कृती महोत्सवात मंगळवार दि. १३ फेब्रुवारी रोजी राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित निश्चयपूर्तीचे महामेरू हे महानाट्य आयोजित करण्यात आले आहे. महासंस्कृती महोत्सवाच्या पहिल्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानावर पन्नासहून अधिक विविध स्टॉल्स लावण्यात आलेले आहे. यात प्रामुख्याने जिल्ह्यातील महत्त्वाच्या विभागांचे स्टॉल लावण्यात आलेले आहे. तसेच खाद्य संस्कृती जपणाऱ्या बचतगटांचे स्टॉल्स या ठिकाणी लावण्यात आलेले आहे.

# सहकार विद्या मंदिर डोंगर खंडाळा शाळेने राष्ट्रिय स्तरावर क्रीडा स्पर्धेत रचला अपूर्व इतिहास.

**जनसंचलन/बुलढाणा**




स्थानिक डोंगर खंडाळा येथील, स्व. श्रीमती बसंतीबाई देवकिसनजी चांडक सहकार विद्या मंदिर डोंगर खंडाळा शाळेतील कराटे प्रशिक्षक व विद्यार्थ्यांची चमू, आदरणीय भाईजी यांच्या आशीर्वादाने , तसेच सन्माननीय सौ.कोमल मॅडम आणि सन्माननीय डॉ. श्री. झंवर साहेबांच्या मार्गदर्शनाने, शालेय क्रिडा आणि कृती विकास संस्थे तर्फे आयोजित,राष्ट्र स्तरीय तायक्वांडो विश्वचषक स्पर्धा दिल्ली येथे दिनांक ९ फेब्रुवारी ते १२ फेब्रुवारी या दरम्यान सहभागी झाली होती. आणि या स्पर्धेत सुमारे २८ राज्यातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. गौरवास्पद बाब हि की एवढ्या मोठ्या संख्येने उपस्थित विद्यार्थ्यांमध्ये आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी १९सुवर्ण, आणि ३, रौप्य आणि विजयी चषक पदक प्राप्त करून विजयाची परंपरा कायम राखत जिल्ह्याच्या च नव्हे तर महाराष्ट्राच्या अस्मितेत मानाचा शिरपेच रोवला आहे. या यशामध्ये शाळेचे मुख्याध्यापक श्री. सतिश रोढे सर यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे, शिवाय क राटे क्रिडा प्रशिक्षक श्री. ऋषिकेश सोलंकी यांचे अचूक दिग्दर्शन आणि दीर्घ परिश्रम, व श्री. गौतम इंगळे व कु. संध्या काळे, यांचे महत्वाचे सहकार्य ई. ची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली. ही स्पर्धा विविध वयोगटात आयोजित करण्यात आलेली होती.त्यानुसार वयोगट १२वर्षा आतील मुले:१) अनिरुद्ध काकडे,,सुवर्ण २) ओजस बाहेकर, रौप्य ३) आदर्श पारवे, सुवर्ण ४) पियूष चौथमोल सुवर्ण५) चैतन्य बाहेकर.. रौप्य .. १४वर्षा आतील मुले:१) प्रतिक सावळे, सुवर्ण.२) तेजस खरात, सुवर्ण,३) निशांत घुले, सुवर्ण..४) पियूष चव्हाण, सुवर्ण.. १७वर्षा आतील मुले:१) तुषार बर डे सुवर्ण २) सुमित बरडे सुवर्ण..., तसेच १२ वर्षा आतील मुली: कु.प्रिया गाढवे, सुवर्ण २) कु.राजश्री कापसे, सुवर्ण.३) कु. श्रृति बाहेकर, सुवर्ण १४ वर्षा आतील वयोगट मुली:१) कु.जान्हवी शिंदे, सुवर्ण,२) कु.वैष्णवी शिंदे, सुवर्ण,३) कु.वैदेही बाहेकर, रौप्य,४) कु. साक्षी दळवी सुवर्ण ५) कु.कल्याणी राठोड, सुवर्ण,६) कु.श्रुति थोरात, सुवर्ण,७) कु.आकांक्षा वानखेडे, सुवर्ण,८) अक्षरा राठोड, सुवर्ण या यशामध्ये पालक वर्ग, गजानन भगत सचिन खरात यांनीही मोलाची कामगिरी बजावली.मुलांच्या या उत्तुंग भरारीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# गैरवर्तणूकप्रकरणी शिक्षकाची बदली



**जनसंचलन/ संग्रामपूर**

वर्गात विद्यार्थिनीसोबत गैरवर्तणूक करणाऱ्या शिक्षकाची तातडीने बदली करण्यात आली आहे. संग्रामपूर गटशिक्षणाधिकारी यांनी एका पत्रकाद्वारे जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापकांना शिक्षकाला कार्यमुक्त करून अहवाल सादर करण्यासंदर्भात बजावले आहे. संग्रामपूर तालुक्यातील एका गावातील जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळेवरील डी. जे. डिगोळे या शिक्षकाने १० फेब्रुवारीला वर्गात एका विद्यार्थिनीसोबत गैरवर्तणूक केले. यासंदर्भात १३ फेब्रुवारीला शाळा व्यवस्थापन समितीने संग्रामपूर गटशिक्षणाधिकारी अधिकारी यांना निवेदन देऊन या शाळेवरील शिक्षकाला बडतर्फ करण्याची मागणी केली. बुधवारी संबंधित शिक्षकाची बदली करण्यात आली. या शिक्षकाची कारकीर्द पूर्वीही वादग्रस्त ठरली आहे. नांदुरा पंचायत समितींतर्गत मुरंबा येथील जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेवर असताना ६ सप्टेंबर २०२२ ला निलंबित कगण्यात आले आहे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958